महाराष्ट्र शासन

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैदयकीय महाविदयालय अंबाजोगाई जि. बीड

## अधिष्ठाता यांचे कार्यालय

**SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST. BEED**
P(02446)245792/248963/249362/248438/ FAX-02446/247132 website www.srtrmca.org email- srt.acad@rediffmail.com

जा.क्र./स्वारातीग्रावैम/ अस्थाराज/ ७०६० /२०२४ दिनांक :- २७/११/२०२४

प्रति,
मा.आयुक्त (वै.शि.),
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

**विषय** :- प्राध्यापक, शल्यचिकीत्साशास्त्र विभाग हे पद मा.संचालनालय **स्तरावरुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरणे बाबत]**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास सविनय सादर करण्यात येते की, या संस्थे अंतर्गत शल्यचिकीत्साशास्त्र विभागा मध्ये प्राध्यापक व विभाग प्रमूख या पदावर कायम सेवेने कार्यरत डॉ.सुधीर भास्करराव देशमूख यांची विनंती बदलीने नांदेड येथे पद्स्थापना करण्यात आलेली असल्यामूळे सदरील पद हे रिक्त आहे.

सद्यस्थितीत सदरील पद रिक्त असल्यामूळे एनएमसी,नवी दिल्ली यांच्या निरिक्षणाच्या वेळेस त्रुटी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करिता, आपणास विनंती करण्यात येते की, शासना मार्फत कायम स्वरुपी प्राध्यापक व विभाग प्रमूख, शल्यचिकीत्साशास्त्र हे पद भरण्यात येई पर्यंत या संस्थे मध्ये करार तत्वावर ३६४ दिवसांसाठी सहयोगी प्राध्यापक या पदावर कार्यरत डॉ.बालाजी साळुंके यांचे प्राध्यापक या पदाचे आपल्या स्तरावरुन करार तत्वावर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आल्यास एनएमसी,नवी दिल्ली यांच्या निरिक्षणाच्या वेळेस त्रुटी निर्माण होणार नाही.

आपल्या माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

(डॉ.शं.सं.धपाटे)
अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

महाराष्ट्र शासन

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

## SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVERNMENT MEDICAL COLLEGE AMBAJOGAI.

(Office Of The Dean)

जा.क्र. स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.महा.अं./अस्था-राज /जाहीरात/प्राध्यापक/ 7139 /२०२४ दिनांक ०२.१२.२०२४.

## जाहिरात

उपरोक्त प्रकरणी निम्नस्वाक्षरीतांना दिलेल्या निर्देशानूसार स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय अंबाजोगाई येथील अध्यापकांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने विभागीय निवड मंडळा मार्फत रुग्णहित व रुग्णसेवा लक्षात घेता (३६४) दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा विहित नमुना कार्यालयीन वेळेत मिळेल. तसेच,अर्ज करते वेळी उमेदवार शासकीय/अशासकीय सेवेत कार्यरत असलयास त्यांनी अर्ज विहित मार्गाने सादर करावा अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच विहित नमुन्यातील अर्जाचाच मुलाखतीसाठी विचार केला जाईल.प्रत्यक्ष मुलाखतीस हजर राहताना आपणास मुळ शैक्षणिक कागदपत्र पत्र सादर करणे बंधणकारक राहील.(या पुर्वी या कार्यालयात सादर केलेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही.)

| | | रिक्त पदे |
|---|---|---|
| अ.क्र | विभागाचे नाव | प्राध्यापक (कंत्राटी) |
| १. | शल्यचिकीत्साशास्त्र | ०१ |
| २. | मनोविकृतीशास्त्र | ०१ |

१) फॉर्म विक्रीची शेवटची तारीख - ०८/१२/२०२४ कार्यालयीन वेळ

२) अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख - ०९/१२/२०१४ सकाळी १२ वाजेपर्यंत.

३) मुलाखतीची तारीख - १०/१२/२०२४

४) मुलाखतीचे ठिकाण - अधिष्ठाता यांचे कार्यालय, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड.

कृपया मागील पानावर

गुणवता यादी ही खालील प्रमाणे तयार करण्यात येईल.

१.संबधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे मार्क गृहीत धरण्यात येतील.

२.पदव्युत्तर मार्क समान असतील तर उत्तीर्णतेचे प्रयत्न गृहीत धरण्यात येतील.

३.क्रमांक २ येथील ही मार्क समान असतील तर $3^{rd}$ MBBS (Major) चे मार्क गृहीत धरण्यात येतील.

४.प्राध्यान्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

.अ)या महाविद्यालया मधून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल.

ब)इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालया मधून उत्तीर्ण झालेले उमेदवार.

क)खाजगी वैद्यकीय महाविद्यालय मधून उत्तीर्ण झालेले उमेदवार.

५.सदरील निवड झालेल्या उमेदवारांना रु.२,००,०००/- इतके मानधन देय राहील.

६.आपणास सदरील रिक्त जागेवर शासना मार्फत उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर आपले आदेश कोणतीही पूर्वसूचना न देता आपोआप संपूष्टात येतील.

७.आपणास सदरील पदाचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास आपणास एक महिन्याची पूर्वसुचना देणे बंधन कारक राहतील तसेच मा.संचालनालयाने दिलेल्या अटि व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

डॉ.शं.स.धपाटे
अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अंबाजोगाई जि.बीड.

प्रत :-

१. सुचना फलक, अधिष्ठाता कार्यालय, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड.